# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः05.06.2024** **वारःबुधवार**

---

1. लोकसभा निवडणुकीत एनडीएला बहुमत, भाजप सर्वात मोठा पक्ष
2. इंडी आघाडीला 231 जागा, काँग्रेसच्या जागांमध्ये लक्षणीय वाढ
3. मतदानोत्तर चाचण्यांमुळे निर्माण झालेल्या अपेक्षेनुसार निकाल न लागल्यानं शेअर बाजारात पडझड
4. आज जागतिक पर्यावरण दिनी सुदृढ जमीन पुन्हा प्राप्त करण्याची संकल्पना आणि
5. दक्षिणेकडील काही भागांमध्ये मान्सूनची आगेकूच होण्यासाठी स्थिति अनुकूल

**संख्याबळ**

लोकसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीनं बहुमत मिळवलं आहे. देशातील लोकसभेच्या एकंदर 543 जागांपैकी भारतीय जनता पक्ष-प्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी-एनडीएनं 292, तर काँग्रेस-प्रणीत इंडिया आघाडीनं 233 जागांवर विजय मिळवला. एनडीएवर सलग तिसऱ्यांदा विश्वास दाखवल्याबद्दल भाजप नेत्यांनी मतदारांचे आभार मानले आहेत. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत भाजपसह राष्ट्रीय लोकशाही आघाडीला यावेळी कमी जागा मिळाल्या असून, काँग्रेससह विरोधी पक्षांनी मात्र गेल्या वेळेपेक्षा चांगली कामगिरी केली आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा रायबरेली आणि केरळमधल्या वायनाड मतदारसंघातून मोठ्या मताधिक्यानं विजय झाला.

**राज्यनिहाय स्थिती**

केरळमध्ये भाजपला प्रथमच एका जागेवर विजय मिळाला. मध्यप्रदेश, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, दिल्ली, त्रिपुरा, अरूणाचल प्रदेश तसंच अंदमानात भारतीय जनता पक्षानं एकहाती विजय मिळवला, तर पंजाब आणि तमिळनाडूमध्ये भाजपला एकही जागा मिळू शकली नाही.

आंध्रप्रदेशात तेलगू देसम पक्षाला 16, भाजपला तीन; आसाममध्ये भाजपला नऊ, काँग्रेसला तीन; छत्तीसगडमध्ये भाजपला 10, काँग्रेस एक; हरियाणामध्ये भाजप आणि काँग्रेस प्रत्येकी पाच; झारखंडमध्ये भाजप आठ तर झारखंड मुक्ती मोर्चा तीन, काँग्रेस दोन असं संख्याबळ आहे. ओडिशामध्ये भाजप 19, काँग्रेस आणि बीजू जनता दल प्रत्येकी एक; कर्नाटकमध्ये भाजप 17, काँग्रेस नऊ, धर्मनिरपेक्ष जनता दल दोन अशी स्थिती आहे. तेलंगणमध्ये भाजप आणि काँग्रेस प्रत्येकी आठ, एमआयएम एक; राजस्थानमध्ये भाजप 14, काँग्रेस आठ असं संख्याबळ असून गुजरातमध्ये भाजपनं 25 जागांवर दणदणीत विजय मिळवला आहे. काँग्रेसला एक जागा मिळाली आहे.

बिहारमध्ये भाजप आणि संयुक्त जनता दल यांना प्रत्येकी 12, लोकजन शक्ती पक्ष पाच, काँग्रेस तीन तर राजद चार; उत्तर प्रदेशमध्ये  समाजवादी पक्ष 37, भाजप 33, काँग्रेस सहा; तर पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसनं 29, काँग्रेस एक तर भाजपनं 12 जागा जिंकल्या आहेत. काश्मीरमध्ये नॅशनल कॉन्फरन्स दोन, भाजप दोन; दादरा नगर हवेली इथं भाजप एक, अपक्ष एक तर गोव्यात भाजप आणि काँग्रेस प्रत्येकी एक, मेघालयात काँग्रेस आणि व्हाईस ऑफ पीपल्स पार्टीने प्रत्येकी एक जागा जिंकली आहे.

तामिळनाडूत द्रमुक 22, काँग्रेस नऊ तर माकप आणि भाकप प्रत्येकी दोन जागांवर विजयी झाले. काँग्रेसनं केरळमध्ये सर्वाधिक 14 तर पंजाबात सर्वाधिक सात जागा जिंकल्या. शिवाय, मणिपूरच्या सर्व दोन तसंच चंदीगड, लक्षद्वीप, नागालँड, तसंच पुड्डुचेरी इथल्या प्रत्येकी एका जागेवर काँग्रेसनं विजय मिळवला. आम आदमी पक्षाला पंजाबात तीन जागांवर समाधान मानावं लागलं.

**<u>विजयी उमेदवार</u>**

भाजपचे ज्येष्ठ नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शहा, शिवराजसिंह चौहान, ज्योतिरादित्य शिंदे, अनुरागसिंह ठाकूर, तेजस्वी सूर्या, कंगना राणावत, हेमा मालिनी, आदी दिग्गजांचा विजय झाला, तर स्मृती इराणी, मेनका गांधी, भारती पवार, कपिल पाटील आणि रावसाहेब दानवे या विद्यमान मंत्र्यांसह सुधीर मुनगंटीवार, सुजय विखे पाटील, नवनीत राणा, उज्ज्वल निकम आदी दिग्गजांना पराभवाचा सामना करावा लागला.

**<u>फडणवीस प्रतिक्रिया</u>**

देशातल्या जनतेनं पुन्हा एकदा राष्ट्रीय लोकशाही आघाडीला संपूर्ण बहुमत प्रदान केलं असून, नरेंद्र मोदी सलग तिसऱ्यांदा भारताचे पंतप्रधान होणार आहेत, असं भाजपचे नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. इंडिया आघाडीतील सर्व पक्ष मिळून जितक्या जागांवर आघाडीवर आहेत, त्यापेक्षा अधिक जागा एकट्या भाजपाच्या वाट्याला आल्या आहेत. शिवाय, आंध्रप्रदेशात तेलगू देसम पार्टीच्या नेतृत्त्वात भाजपा युतीला, आणि ओडिशात भाजपाच्या नेतृत्त्वात दणदणीत यश मिळालं असल्याचं फडणवीस यांनी म्हटलं आहे.

**<u>बैठक</u>**

दरम्यान, इंडि आघाडीची आज दिल्लीमध्ये बैठक होणार असून, या बैठकीला आपण उपस्थित राहणार असल्याचं शरद पवार तसंच उद्धव ठाकरे यांनी सांगितलं आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी- एनडीएचीही आज दिल्लीत बैठक होणार असून, केंद्रीय मंत्रिमंडळाचीही आज बैठक बोलावण्यात आली असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

**<u>महाराष्ट्र-आकडेवारी</u>**

महाराष्ट्रातील 48 मतदारसंघांपैकी महाविकास आघाडीला 30, तर महायुतीला 17 जागा मिळाल्या आहेत. 13 मतदारसंघात काँग्रेस तर 9 ठिकाणी भाजपानं विजय मिळवला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला 9 तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाला 8 आणि शिवसेनेला 7 जागा मिळाल्या असून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला 1 जागा मिळाली आहे. एक अपक्ष उमेदवार विजयी झाला आहे.

**महाराष्ट्रात काही प्रमुख लढतींमध्ये -**

- बीडमध्ये भाजपाच्या पंकजा मुंडे यांना पराभूत करत शरद पवार गटाचे बजरंग सोनवणे विजयी झाले आहेत.
- प्रतिष्ठेच्या ठरलेल्या बारामती मतदारसंघात, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सुनेत्रा पवार यांचा पराभव करत विजय मिळवला.
- नाशिक मतदारसंघातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे राजाभाऊ वाजे निवडून आले आहेत.
- रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघात भाजपाचे उमेदवार नारायण राणे विजयी झाले.
- नंदुरबार लोकसभा मतदारसंघात काँग्रेसचे उमेदवार गोवाल पाडवी यांनी भाजपाच्या हिना गावीत यांना पराभूत केलं.
- पालघर मतदारसंघात भाजपाचे उमेदवार हेमंत सावरा यांना विजयी घोषित करण्यात आलं आहे.
- जालना मतदार संघात भाजपाचे विद्यमान खासदार रावसाहेब दानवे यांना पराभव पत्करावा लागला. काँग्रेसचे कल्याण काळे यांनी त्यांच्यावर मात केली.
- दिंडोरी मतदारसंघात केंद्रीय मंत्री आणि भाजपच्या उमेदवार भारती पवार यांच्यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे भास्कर भगरे यांनी मात केली.
- उत्तर मुंबई मतदारसंघात भाजपाचे उमेदवार पीयूष गोयल विजय झाले, मात्र, उत्तर मध्य मुंबईत भाजपाचे उज्ज्वल निकम यांना पराभव पत्करावा लागला. दक्षिण मुंबई मत दारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अरविंद सावंत विजयी झाले आहेत.

**ओडिशा विधानसभा**

ओडिशा विधानसभेच्या 147 जागांसाठी झालेल्या निवडणुकीत भाजपनं 78 जागा जिंकून बहुमत मिळवल्यानं तिथं आता सत्तांतर होणार आहे. सध्या राज्यात सत्तेवर असलेल्या बिजू जनता दलानं 51 जागा जिंकल्या.

**आंध्र निकाल**

आंध्र प्रदेश विधानसभा निवडणुकीत तेलुगू देसम पक्षानं 175 पैकी 135 जागा जिंकत निर्विवाद बहुमत मिळवलं आहे. सत्ताधारी वायएसआर काँग्रेस पक्ष केवळ 11 च जागा जिंकू शकला. या निवडणुकीत जनसेना पक्षानं 21 तर भाजपनं 8 जागांवर विजय मिळवला आहे. दरम्यान, जगातील अनेक नेत्यांनी, पुन्हा सत्तेत आल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं अभिनंदन केलं आहे.

**शेअर बाजार-पडझड**

लोकसभा निवडणुकांच्या निकालांचे कल आणि परिणाम जाहीर होण्यास सुरू होताच काल मुंबई शेअर बाजार तसंच राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निर्देशनकांत मोठी घसरण होण्यास सुरुवात झाली. पहिल्या सत्रात मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक 1700 अंकांनी तर निफ्टी 500 अंकांनी कोसळला. बाजार बंद होताना मुंबई शेअर बाजार 72 हजार 79 अंकांवर बंद झाला.

**<u>जागतिक पर्यावरण दिन</u>**

पर्यावरणविषयक तातडीच्या समस्यांवर जनजागृती आणि कृती करण्याच्या उद्देशानं आज जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जात आहे. पर्यावरणाचं रक्षण करण्यासाठी जागरूकता आणि कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या नेतृत्वाखाली हा एक जागतिक उपक्रम आहे. या दिवसाचा आरंभ 1972 मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेनं मानव पर्यावरणावरील स्टॉकहोम परिषदेदरम्यान केला होता. त्यानंतर 1973 पासून, तो दरवर्षी 5 जूनला साजरा केला जातो. पर्यावरणविषयक समस्यांवर जागरूकता वाढवणं, कृतीला आणि जागतिक सहकार्याला प्रोत्साहन देणं हे त्याचं उद्दिष्ट आहे. या वर्षी (2024), जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना, "जमीनीचं पुनःस्थापन, वाळवंटीकरण आणि दुष्काळावर मात" अशी आहे. सुदृढ जमीन पुन्हा मिळवणं, वाळवंटांचा विस्तार होण्यापासून रोखणं आणि पाण्याच्या कमतरतेवर उपाय करणं यांच्याशी ही संकल्पना निगडीत आहे.

**<u>टी 20</u>**

टी 20 जागतिक विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेच्या डॅलस इथं झालेल्या सामन्यात नेदरलँड्सनं नेपाळ संघाचा सहा गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या नेपाळ संघानं 19 षटकं आणि दोन चेंडूत 106 धावाकेल्या. नेदरलँडच्या टीम प्रिंगल आणि लोगन व्हॅन बीक यांनी प्रत्येकी तीन बळी घेतले. प्रिंगलला सामनावीर घोषित करण्यात आलं. भारत आणि आयर्लंड यांच्यातील सामना आज न्यूयॉर्क इथं खेळला जाणार आहे.

**<u>मान्सून</u>**

भारतीय हवामान विभागानं पुढील 4-5 दिवस देशाच्या वायव्य भागात वादळ, विजा आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह पावसाचा अंदाज वर्तवला आहे. याच कालावधीत वायव्य आणि पूर्व भारतातील काही भागांमध्ये कमी तीव्रतेसह उष्णतेच्या लाटेची स्थिती कायम राहण्याची शक्यता आहे. नैऋत्य मान्सून मध्य अरबी समुद्राच्या उर्वरित भागात, कर्नाटकचा उर्वरित भाग, दक्षिण महाराष्ट्राचा काही भाग, तेलंगण आणि किनारी आंध्र प्रदेश, दक्षिणेकडील काही भागांमध्ये आणखी पुढे जाण्यासाठी परिस्थिती अनुकूल आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.